# इन्स्टिटयुट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिनिअरींग, लोणेरे येथे संविधान सप्ताह संपन्न

भारतीय संविधान दिनानिमित्त संस्थेमध्ये दि.२६ नोव्हेंबर ते २ डिसेंबर, २०१८ या कालावधीत खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

१. **उद्देशिकेचे वाचन** : डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठांतर्गत इन्स्टिटयुट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिनिअरींग विभागातर्फे दि.२६/११/२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता भारतीय राज्यघटनेने शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मा.प्राचार्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन त्यानंतर भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.






२. **संविधानाबद्दल विचार** : मा.प्राचार्यांनी आपल्या भाषणात भारतीय राज्यघटनेचा २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी स्विकार केला गेला व २६ जानेवारी, १९५० पासून भारतीय राज्यघटना कशा प्रकारे अंमलात आणली गेली याबद्दलची संपूर्ण माहिती विषद करुन सांगितली व त्यांनतर संविधानाबद्दलची प्रास्ताविका, मुलभूत हक्क, कर्तव्ये व जबाबदाऱ्या इत्यादी संविधानातील महत्वाची कलमे व कायदे याविषयी सविस्तर माहिती देउन त्रिस्तरीय शासनव्यवस्थेबद्दल खालील विचार मांडले.

कायदे मंडळ : विधीमंडळाची स्थापना करुन त्यातील लोकप्रतिनिधींची लोकांमधून नियुक्तीची तरतूद केली व विधीमंडळ संविधानाने आखून दिलेल्या चौकटीत लोकोपयोगी कायदे करेल. विधानमंडळातील लोकप्रतिनिधी नियुक्तीसाठी निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली.

कार्यकारी मंडळ : लोकहितासाठी केलेले कायदे अमलात आणण्यासाठी मजबूत व सशक्त प्रशासन व्यवस्था निर्माण केली. प्रशासन व्यवस्थेसाठी लोकसेवा आयोग स्थापन करण्यात आला

न्यायमंडळ – कायदेमंडळाकडून केलेले कायदे हे राज्यघटनेच्या स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्याय या मूलभूत तत्वास बाधा येणार नाही याकडे लक्ष देणे अन्यथा असे कायदे रद्द करणे.

वरिल त्रिस्तरीय शासन व्यवस्था भारत देशासाठी एकसारखीच आहे, त्यामुळे देशात वेगवेगळे प्रांत, भाषा असून देखील सर्वांना एकत्रित बांधून ठेवण्याचे काम राज्यघटनेमुळे शक्य झाले. जगाला स्मरणात राहिल असे अस्मरणीय काम डॉ.आंबेडकरांनी या राज्यघटनेच्या माध्यमातून केलेले आहे.

३. **प्रमुख वक्ते** : दि.२७ नोव्हेंबर, २०१८ रोजी विद्यापीठाच्या सभागृहात संविधान दिनानिमित्त श्री.सुरेश हावरे, अणुशास्त्रज्ञ यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.








४. **एन.सी.सी. युनिट मार्फत संविधान उद्देशिकेचे वाचन** : विद्यापीठाच्या एन.सी.सी. युनिट मार्फत संविधान दिनानिमित्त उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.



